# सर्वांगीण विकासासाठी...

**शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांतील दरी आणखी रुंदावत आहे. 'शिक्षणाने ही दरी भरून काढता येऊ शकते; मात्र त्यासाठी एक प्रामाणिक, निश्चित व कायमस्वरूपी' प्रयत्नांची गरज आहे.**

**प्रसाद पवार**

'खेड्याकडे चला' असा संदेश महात्मा गांधी यांनी आपल्याला दिला. मुख्यत्वेकरून देशातील खेड्यांमध्ये राहणाऱ्या नागरिकांना मुख्य प्रवाहात आणण्याचा व खेड्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा मंत्र या संदेशामागे होता. आज या संदेशाचे कितपत पालन होते, यापुढे प्रश्नचिन्ह असले तरी शहरी व ग्रामीण जनतेत एक प्रकारची दरी निर्माण झाली आहे, असे निश्चितपणे जाणवते.

### परिस्थितीची भीषणता

ही स्थिती कशी आहे हे पाहण्यासाठी जवळचेच उदाहरण घेऊ यात... पुणे जिल्ह्यातील भोर, मावळ, वेल्हे, मुळशी, जुन्नर अशा जवळपास सर्वच तालुक्यांमधील दुर्गम वाड्या-वस्त्या व गावांमध्ये प्राथमिक सुविधा आजही पोचलेल्या नाहीत हे वास्तव आहे. या गावांमध्ये भरणाऱ्या आठवडा बाजारांना भेट देऊन त्या नागरिकांशी संवाद साधलात तर 'जगण्याची लढाई काय असते' याचा केवळ शाब्दिक अनुभव तुम्ही घेऊ शकता. 'पोटाचा जाळ व्हयना तवा पिकवावं लागत कायबाय', 'आठ आठ किलोमीटरची पायपीट व्हती तवा पोरान्ला साळंचं त्वांड दिसतं', हे त्यांचे उद्गार या लढाईचे वास्तव समोर आणतात. आपल्या पुणे जिल्हा व रायगड जिल्हा यांच्या सीमेवरील मोहरी वस्त्यांवरील शाळांवर पोचण्यासाठी तर शिक्षकांनाच

शाळा बंदच होतात. नसरापूरजवळच्या कांबरे वस्तीवर राहणाऱ्या मुलांना ओढ्याचे पाणी वाढले की ते ओसरेपर्यंत शाळेला सुट्टी घ्यावी लागते. वाईजवळच्या जोर परिसरातील गोळेगावच्या मुलांना आजही शाळेसाठी जुन्या महाबळेश्वराचा डोंगर चढून जावे लागते.

### आपण त्यापासून दूर...

आपण थोडे आडबाजूला गेलो तर वास्तवाची चटका बसविणारी जाणीव आपल्याला होते. अन्यथा आपल्या 'रुटीन'मध्ये असे काही सभोवती आहे, हे आपल्या गावीही नसते. ही झाली आपल्या परिघातील काही उदाहरणे. देशभरातील सहा लाख खेड्यांमध्ये जगणाऱ्या सत्तर टक्के ग्रामीण जनतेचे प्रश्न कसे सुटणार..? परीघ विस्तारताच वास्तवाचे आणखी भीषण रूप सामोरे येते. त्यांच्यासारख्या परिस्थितीत एखादा दिवस काढणे शहरी पांढरपेशांना कठीण होईल. मात्र यामुळेच शहरी व ग्रामीण भागातील नागरिक यांच्यातील दरी आणखी रुंदावत आहे. 'शिक्षणाने ही दरी भरून काढता येऊ शकते; मात्र त्यासाठी एक प्रामाणिक, निश्चित व कायमस्वरूपी' प्रयत्नांची गरज आहे.

### वसा शिक्षणाचा

हा विचार समोर ठेवून काही पांढरपेशांनी....हो आपल्या कोथरूड भागातील दहा-पंधरा नागरिकांनी एकत्र येऊन 'राष्ट्रीय सर्वांगीण ग्रामविकास संस्था' ही संस्था १९९५ मध्ये स्थापन केली.

सध्या त्यांनी मुळशी तालुक्यातील २५ ते ३० खेड्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. खेड्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रथम तेथील मुलांना शिक्षणाकडे वळविणे हा मुख्य उद्देश आहे. त्यानुसार असदे खोऱ्यातील पाच गावांतील मुलांसाठी स्वामी विवेकानंद विद्यालय ही माध्यमिक शाळा १९९५ मध्ये स्थापन झाली. सध्या शाळेत दोनशे मुले शिकत आहेत. शाळा सोडणाऱ्या मुलींची गळती थांबविण्यात यश आले आहे. मैदानी व फुटबॉलसारखे आधुनिक खेळ, आधुनिक शेती तंत्रज्ञान, विज्ञान प्रदर्शने, शैक्षणिक सहली या माध्यमातून

आहे. इथे मुलींच्या शिक्षणासाठी विशेष प्रोत्साहन दिले जाते. दहावीनंतरच्या शिक्षणाच्या सोयी सुविधा मुलींना व हुशार विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या जातात. दहावीनंतरच्या शिक्षणासाठी व्यवसाय मार्गदर्शनही केले जाते. विधान आश्रम पाबळचा अभ्यासक्रम ८ वी ते १० वी साठी शाळेत राबविला जातो. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून ऊर्जा, अभियांत्रिकी क्षमता, पशुवैद्यकीय, वैद्यकीय, पाककला, गृहविज्ञान अशा अनेक विषयांची प्राथमिक ओळख व किमान क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. त्यातून भावी जीवनातील आपले क्षेत्र निवडणे या मुलांना सोपे जाऊ शकते. तालुक्यातील माध्यमिक शिक्षकांचे तज्ज्ञांच्या साह्याने इंग्रजी, गणित व विज्ञान अशा विषयांचे प्रशिक्षण दिले जाते.

विशेष म्हणजे तालुक्यातील माले येथे २० क्षमतेचे वसतिगृह चालविले जाते. या वसतिगृहात टेमघर धरण परिसरातील व डोंगरदऱ्यांत राहणाऱ्या विद्यार्थ्यांची सोय होते आहे. शिळेश्वर येथे श्री प्रतिष्ठानच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या वसतिगृहात मुळशी धरणातील सुमारे वीस खेड्यांतील विद्यार्थ्यांची सोय होते आहे. या दोन्ही वसतिगृहांत ५ वी ते १०वीतील विद्यार्थ्यांची सोय होते. पिरंगुट येथे ११ वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह आहे. येथील विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रकारचा दिनक्रम असून, त्यांच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक क्षमता वाढवून त्यांचा सर्वांगीण विकास करण्याकडे सातत्याने लक्ष दिले जाते. याशिवाय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी स्वयंरोजगारनिर्मिती व व्यवसाय मार्गदर्शनासाठी समुपदेशन दिले जाते. सैन्यभरती पूर्वतयारीचे साप्ताहिक वर्ग घेतले जातात. याशिवाय संस्थेचे महिला व युवतीसंघटन, पाणलोट विकास, स्वयंरोजगार व शेतीसाठी मार्गदर्शन असे प्रकल्प आहेतच.

### गुणवंतांची फळी

मागील वर्षी संस्थेचे अश्विनी भरम, प्रमोद निकाळजे, मिलिंद जोशी हे विद्यार्थी येथील महिंद्र महाविद्यालयाच्या अक्षरा प्रकल्पाच्या माध्यमातून पुढील शिक्षणासाठी अमेरिकेलाही गेले.

संस्थेचे विद्यार्थी आपापल्या भागातील वसतिगृहात विद्यार्थ्यांना शिकवितात, तर काही जणांनी आणखी उंच भरारी घेतली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची शिक्षणाची गरज ओळखून काही निवृत्त शिक्षकांनी सुरू केलेली ही संस्था 'पांढरपेशा परीघ' ओलांडून पुढे गेली आहे. संस्थेचे कामकाज चालविण्यासाठी हातभार लावणारे मध्यमवर्गीयही आहेत. शहरी व ग्रामीण नागरिकांतील दरी सांधण्यासाठी संस्थेने टाकलेले शिक्षणाचे पाऊल आता जम बसवू लागले आहे. संस्थेच्या अधिक माहितीसाठी अनिल व्यास यांच्याशी ९४२२३६६७१४ या क्रमांकावर संपर्क साधू शकता.

